# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १३/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बेला:— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा सोनेगाव व बसस्टॅड येथे दिनांक १२/०९/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान बेला पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बेला पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. पी.—०७/ बी—१९९५ क्रमांकाच्या कंटेनरला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी क्र. १. शफिद रशीद खान, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं २७७ हाउसींग बोर्ड, कॉलनी करोद बेरसीया रोड हुजुर भोपाळ (एमपी), २) अली कमार अब्बास, वय २५ वर्षे, रा. घर क्र १०१ अर्जुन नगर, मौदा मिल ठाणा एमपी नगर जि. भोपाळ (एमपी), ३) हाबीद वल्द कमर अली खान, वय १९ वर्ष रा. बगचिया, ता. नटेरण, जि. बदिशाह एमपी यांच्या ताब्यातुन ६५(बैल) जनावरे कि. ६,५०,०००/—रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती २६,५०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक सुरेंद्र ठाकरे, पो.स्टे. बेला यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी मो.क्र. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बेलाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री अजित कदम यांचे नेतृत्वात सहायक फौजदार अजय चौधरी, पोलीस हवालदार सुरेन्द्र रंगारी, मास्तकर व पोलीस नाईक सुरेंद्र ठाकरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

### खून

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा बेलोना येथे दिनांक १२/०९/२०२२ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान आरोपी नामे— भरत रामचंद्र कळंबे, वय ३० वर्ष, रा. बेलोना याने त्याचे ईतर साथीदारासह मिळून फिर्यादीचे वडील नामे— केशवराव बाबूराव मस्के (मृतक), वय ५२ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ बेलोना ता. नरखेड जि. नागपूर यांना त्यांनी गावातील मुलगी हिचे अतिप्रसंगचे केसमध्ये साक्षीदारांना कोर्टमध्ये भरत कळंबे याचा भाउ प्रेमलाल कळंबे याचे विरोधात मदत करीत असल्याचे कारणावरुन बंदूकीचे गोळीने डोक्यावर मारुन खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कु निकीता केशव मस्के, वय २३ वर्ष, रा वार्ड क्र. ०२ बेलोना ता. नरखेड जि नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ३४ भादंवि. सहकलम ३, २५

भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री आचरेकर मो.क्र. ८३८००७२२११ हे करीत आहे.

## घरफोडी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील ४ टेकाडी कॉलनी डब्लु सी. एलच्या मागे येथे दिनांक ११/०९/२०२२ चे १५.०० वा. ते दिनांक १२/०९/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रदीप मारोतराव विलायतकर, वय ४२ वर्ष, रा. टेकाडी कॉलनी डब्लु.सी.एल यांचे मागे वार्ड नं समुध्दी नगर टेकाडी समाज भवन कन्हान हे अमरिकन ट्रॉवर कंपनी ए.टी.सी. येथे टेक्नीसीयल म्हणुन मागील १७ वर्षापासुन नागपुर कार्यालयात काम करतात. फिर्यादी हे १५.०० वा. आपल्या घराला कुलुप लावुन डयुटी वर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन बेडरूम मधील कपाटामध्ये ठेवलेले नगदी ७,०००/–रू. व गुल्लक मध्ये ठेवलेले अदांजे ३,०००/–रू. तसेच सोन्या–चांदीचे दागिने कि. ३५,०००/–रू. चा माल असा एकुण कि. ४५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो. नं. ९२८४२६२५९६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील चिरव्हा मौदा जि. नागपूर येथे दिनांक ०४/०९/२०२२ चे १४.०० वा. ते दिनांक १२/०९/२०२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– नरेश किसन रामटेके वय ५१ वर्षे रा. चिरव्हा ता. मौदा जि. नागपुर यांचे घराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन आलमारीतील लॉकर मधिल ठेवलेले सोन्याचे–चांदीचे दागिने किंमती ३६,०००/–रू. व नगदी ४,०००/–रू. असा एकुण ४०,०००/–रूपयाचा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार हरिष यंगलवार मो.नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**